जा. क्र. १९७/२०१८

धर्मादाय आयुक्त कार्यालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई
दिनांक ०९.०१.२०१८

09 JAN 2018

# परिपत्रक क्रमांक ५२९/२०१८ दिनांक ०९.०१.२०१८

या परिपत्रकाद्वारे सर्व धर्मादाय सह आयुक्त यांना असे निर्देशित करण्यात येते की, राज्यात अनेक सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक संस्थांमधील विश्वस्तांमध्ये वाद असून या वादांमुळे त्या त्या संस्थेमधील कर्मचारी, विदयार्थी, भक्त, भाविक यांचे नुकसान होत आहे. सदरील वादामुळे अनेक संस्थांचे भवितव्य धोक्यात आले आहे. पर्यायाने त्या संस्थेबाबत तक्रारी वाढत असून आपल्या कार्यालयात अशा संस्थांची अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. या करीता, आपल्या कार्यालयाने विश्वस्तांमधील वाद मिटविण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे. त्यामुळे आपण 'वादमुक्त विश्वस्त संस्था' हे अभियान घेणार असून या अभियाना अंतर्गत प्रत्येक धर्मादाय सह आयुक्त यांनी त्यांच्या विभागातील वाद असलेल्या संस्थांची यादी तयार करावी व सदरील वाद मिटविण्यासाठी प्रयत्न करावेत. धर्मादाय उप आयुक्त व सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्याकडून माहिती घेवून धर्मादाय सह आयुक्त यांनी या बाबत पुढाकार घ्यावा. जर आवश्यकता असेल तर ही अधिकारीणी सुध्दा विश्वस्तांमधील वाद मिटविण्यासाठी पुढाकार घेईल अथवा त्या विभागास भेट देवून विश्वस्तांशी चर्चा करतील, त्यामुळे आपण यासाठी प्रयत्न करावेत.

(शि. ग. डिगे)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत-
१. परिपत्रक धारिणी
२. सर्व धर्मादाय सह आयुक्त
३. सर्व धर्मादाय उप आयुक्त
४. सर्व सहायक धर्मादाय आयुक्त

D:\mbsarnobat\Administrative orders-circulars\January, 2018 docx